Club 55 ची सहल

Club 55 च्या वार्षिक सहलीला ह्या वर्षी मी माझ्या तीन–चार मैत्रीणीबरोबर गेले होते. आम्हांला सर्वाना खूपच मजा आली. मुख्य म्हणजे पावसाने आदल्याच दिवशी मनसोक्त थैमान घातले पण सहलीच्या दिवशी नेमका गायब झाला. त्यामुळे हवा तशी ढगाळ पण आल्हाददायक होती.

आम्ही तिथे पोहोचल्यावर आम्हां 'अती–जेष्ठ' नागरिकांच मनापासून स्वागत केल गेल. आणलेल्या सर्व सामानाची व्यवस्थित मांडामांड चालली होती. सर्वजण गप्पा मारण्यात दंग झाले होते. थोडयाच वेळात दुपारच्या जेवणासाठी म्हणून तरूण मंडळी पिझ्झा घेऊन आली. Club 55 च्या आयोजकांनी मग पटापट सर्वाना गरमागरम पिझ्झा दिला. पिण्यासाठी कोक, बरोबर पाण्याचीही सोय होती.

त्यानंतर मीना देशपांडेच्या नातवाने, निखिलने 'शिवाजी म्हणतो' (Simon says) हा खेळ खेळून मोठ्या माणसांना (स्वतःच्या आजोबांनासुध्दा) खेळवलं.

मग बेत होता भेळ, कलींगड व browmies चा. असा हा खाण्याचा सुटसुटीत कार्यक्रम आटोपल्यावर सर्वानी आपापली ओळख करून दिली. ओळख करून देतांना सुध्दा एकमेकांची खिल्ली उडवण्याची संधी कोणी सोडली नाही. मीना देवधरने स्वःत बनवलेले अस्सल कंदी पेढे सर्वांना वाटून तिच्या मुलाच्या लग्नाचा आनंद साजरा केला. अशी ही खेळीमेळीची व प्रसनवातावरणातली ही Club 55 सहल. आम्ही मैत्रीणी पुढल्या सहलीची वाट पहात आहोत.

काही सुचना – सर्वात प्रथम सहलीच्या पत्रकांत आयोजकांचा किमान एकतरी cell phone नंबर द्यावा. कारण एकदा घर सोडल्यावर मग कुठल्याही कारणासाठी (उदा : पार्क मधली नेमकी आपली राखीव जागा) त्यांच्याशी संपर्क साधता येईल.

खेळ अंताक्षरी किंवा नावांच्या भेड्या सारखे खेळ. एखादी फार प्रचलीत नसणारी माहीती, किंवा फार मागे पडलेला वाक्प्रचार सांगावा. दैनंदिन जीवनांत एखादी गमतीदार घटना घडली किंवा नातवंडांची जी नविन पिढी तयार होते आहे त्यांच्या काही गमती–जमती सांगाव्याात.

जेवण–खाण – दुपारच्या जेवणासाठी पिझ्झा फारच सोयीचा आाहे, पण बदल म्हणून उपमा, किंवा मिसळीची उसळ (एक कृती) व दही बुंदी हा ही सोयीचा प्रकार होऊ शकेल.

श्रीमती जोत्स्नाताई वणकुद्रे